ज्येष्ठ नागरीकांसाठी
निःशुल्क डोळ्यांची तपासणी
वय ५० व त्यापुढील
8 & 9 डिसेंबर 2017 रोजी
सकाळी 10 ते 5
EYE Q
आय–क्यू सुपर स्पेशॅलिटी नेत्र रुग्णालय
निशुल्क मधुमेह व रक्तदाब तपासणी
नोंदणी शुल्क रु ३०/-
पहिला मजला, साई बिझनेससेंटर, हॉटेल यशोदीप शेजारी, सेव्हन हिल उड्डान पुलाजवळ, जालना रोड, औरंगाबाद . संपर्क : 0240-6600443.
मोतिबिंदू । रेटिना । लेसिक । काचबिंदू । जनरल आय चेकअप । औषधे । ऑप्टिकल्स

औरंगाबादेत होईल १३६ स्टील बसची निर्मिती

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : एसटी महामंडळाच्या चिकलठाणा मध्यवर्ती कार्यशाळेत स्टील बॉडीच्या (माइल्ड स्टील) १३६ बसेसची निर्मिती करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. सध्या प्रायोगिक तत्त्वावर बांधण्यात येणारी ॲल्युमिनियमऐवजी स्टील बॉडीची एसटी आकार घेत आहे.

चिकलठाणा मध्यवर्ती कार्यशाळेत ऑगस्टपासून स्टील बॉडीची एसटीची बांधणी सुरु आहे. या कार्यशाळेत गेल्या अनेक वर्षांपासून ॲल्युमिनियम बांधणीतील बसची निर्मिती करण्यात येत आहे. आता महामंडळ त्यापुढे पाऊल टाकत स्टील बॉडीच्या बसची निर्मिती करीत आहे. रस्त्यावरील प्रवास अधिक सुरक्षित करण्यासाठी स्टील बॉडीच्या परिवर्तन बस (लाल बस) बांधणीचा निर्णय महामंडळाने घेतला. त्यानुसार चिकलठाणा मध्यवर्ती कार्यशाळेत प्रायोगिक तत्त्वावर अशा चार बस बांधण्यात येत आहेत. त्यातील पहिल्या बसची निर्मिती पूर्णत्वास जात आहे. चेसिसवर बसचा आकार पूर्ण होत आहे. स्टील बॉडीमध्ये नट-बोल्टांची जागा वेल्डिंगने घेतली आहे. वैशिष्ट्यपूर्ण बांधणीमुळे या बसची उंचीही अधिक आहे. खास प्रशिक्षण घेतलेले कर्मचारी या बसची निर्मिती करीत आहेत.

एप्रिलपासून कार्यशाळेत १३६ स्टील बसेची निर्मिती केली जाणार आहे. सध्या चार बसेस बांधण्यात येत आहेत. यामध्ये पहिल्या बसची बांधणी लवकरच पूर्ण होईल, अशी माहिती कार्यशाळा व्यवस्थापक यू. ए. काटे यांनी दिली.

Avail Free Training*
READY FOR Wi-Fi SHARING. READY WITH
Canon Delighting You Always
EOS 1300D
EOS 80D
EOS 1300D Double Zoom kit
MRP : ₹ 41 695.00/U*
(incl., of all taxes)
FREE* 16GB SDHC CARD + CARRY CASE
EOS 80D Range Starts from
MRP : ₹ 83 995.00/U*
(incl., of all taxes)
FREE* 8GB SDHC CARD
CANON IMAGE SQUARE : SHOP NO. B-6, SAMYAK ARCADE, CANNAUGHT PLACE, CIDCO, AURANGABAD. PH.: 2483971, 2489971
*T&C: Offer available for a limited period or till stocks last. All prices mentioned are MRP (inclusive of all taxes). Models, prices & specifications are subject to change without prior notification. Product images are shown for illustration purpose only. Actual product may vary from images shown. #Conditions apply.
Finance Available*
welworth

हैं तय्यार हम...

Brought to you by SAFFRON LANDMARKS
Aurangabad Maha Marathon
A LOKMAT INITIATIVE
17 Dec 2017
21km
Associate Sponsor riso Ricebran Oil
Powered by DHOOT TRANSMISSION
#MahaMarathon /MahaMarathon

'भागो रे'चा गुंजणार गजर

आतापर्यंत केवळ मुंबई-पुण्यासारख्या महानगरांमध्ये मॅरेथॉन स्पर्धा घेतल्या जात; परंतु 'लोकमत'ने गेल्या वर्षीपासून औरंगाबादमध्ये महामॅरेथॉनचे आयोजन करुन ती कमी भरुन काढली. संपूर्ण कुटुंबाला एकत्र आणून धावण्याचा आनंद देणाऱ्या या स्पर्धेबाबत सध्या खूप उत्साह आहे. १७ डिसेंबर रोजी हजारो नागरिक धावणार असून, संपूर्ण शहर 'भागो रे'च्या नाऱ्यात गुंजणार आहे.

- नितीन बगाडिया, संचालक, प्राइड ग्रुप

शहराचे नाव पसरणार

लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांना समावून घेणारा हा उपक्रम खरंच कौतुकास्पद आहे. एवढ्या मोठ्या पातळीवर ही स्पर्धा घेण्यात येतेय म्हटल्यावर सगळीकडेच औरंगाबाद शहराचे नाव पसरणार, शहराची नवी ओळख निर्माण होणार. त्याचा फायदा शहराला आणि पर्यायाने नागरिकांनाच होणार आहे. पर्यटनाच्या राजधानीमध्ये अशा प्रकारचे 'इव्हेंट' फार गरजेचे असतात. त्यासाठी 'लोकमत'ला शुभेच्छा.

- मानसी वाडकर, संचालक, किडस् कॅपिटल स्कूल

औरंगाबाद फार्मा रनर्स ग्रुप- (डावीकडून) गणेश देशमुख, प्रवीण बनकर, अक्षय घोंगडे, विवेक पाटील, राहुल हरकळ, भारत कदम, अनिल नावडे, जतीन चंदाराणा, चरण कोळी, सौरभ निकम, रामेश्वर ताठे, गोपाल राऊत, अरविंद साळुंखे.

एमजीएम हेल्थ क्लब्स फिटनेस फ्रिक्स ग्रुप- (डावीकडून) शीतल साळवे, रवी मोटवाणी, डॉ. सचिन देशमुख, राजेंद्र माहेश्वरी, माधुरी पाटील, मोनिका माहेश्वरी, रिपी छाबडा, इंदर छाबडा, डॉ. जगदिश लोया, निशांत फेरवाणी, रितेश पारसवाणी, डॉ. विनोद तोतला, मनोज घोडके, चंद्रशेखर पाटील, आशुतोष होलानी.

T-Shirt Partner: SANDIP UNIVERSITY
Co-Sponsors: PRIDE CENTURY, First Idea Education, SARA
ANAND, लाभ, AURACON INFRA, CORE CONSULTANTS, ZAMBAD, PARK GROUP
In Association with: WOCKHARDT, LiFE WiNS, Varroc
Food & Beverage Partner: Frut-X
Official Energy Drink Partner: Enerzal
Sporting Accommodation Partner: istay sporty
Health & Drink Partner: Vedika Care n Cure
Outdoor Partner: abhishek
Healthcare Partners: VIDEOCON SETH NANDLAL DHOOT HOSPITAL, CIGMA HOSPITAL
Race Management: YOU TOO CAN RUN
Health & Fitness Partner: RELAX-ZEAL
Water Partner: COOLZY
Supported by
Banking Partners: बैंक ऑफ़ बड़ौदा Bank of Baroda, Bank of India
Sound Partner: S.S.PRO, Northern Pro Lights
Mall Partner: PROZONE
Sports Partners

शहर बससेवा हवी सक्षम : सार्वजनिक वाहतुकीचे जाळे पसरावे शहरभर

स्मार्ट सिटी बसची प्रतीक्षा

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : सार्वजनिक वाहतूक व्यवस्था ही शहराची जीवनवाहिनी असते. स्मार्ट सिटी अंतर्गत शहरात शहर बससेवा सुरु करण्यासाठी महापालिकेकडून हालचाल सुरु आहे; परंतु पाच, दहा बस देऊन हा प्रश्न सुटणार नाही. तर सध्याच्या परिस्थितीचा विचार करुन चांगल्या आणि स्मार्ट सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचे नियोजन करणे महत्त्वाचे ठरत आहे.

वाहतुकीचा पेच-३

एसटी महामंडळाच्या कारभारामुळे काही वर्षांपासून शहराची सार्वजनिक वाहतूक व्यवस्था ढेपाळली आहे. शहर बससेवा चालविणे ही महापालिकेची जबाबदारी आहे. नुकसान होत असल्याचे कारण पुढे करुन एकप्रकारे शहर बससेवा आपल्या खांद्यावरुन महानगरपालिकेच्या खांद्यावर सोपविण्याचे प्रयत्न एसटी महामंडळाकडून वेळोवेळी झाले; परंतु या नुकसानीला कोणत्या बाबी कारणीभूत आहेत, याचा विचारच केला गेला नाही. त्यामुळे शहरातील केवळ १३ मार्गांवर अवघ्या ३१ शहर बसेस धावत आहेत. स्मार्ट सिटीअंतर्गत महापालिकेकडून प्रायोगिक तत्त्वावर पहिल्या टप्प्यात पाच बस खरेदी करुन त्या चालविण्यासाठी महामंडळाला देण्यात येणार आहेत.

जानेवारी २०१८ पासून या पाच बस सुरु करण्याचा प्रयत्न आहे. या पाच बसेस सुरु करताना पुढील नियोजन करणे गरजेचे आहे. प्रवाशांसाठी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम असणे आवश्यक आहे. ही व्यवस्था चांगली असेल तर रस्त्यावरील वाहतूक नियंत्रणाचा ताण कमी होईल. शहरात अधिकाधिक लोकांना कमीत कमी वेळात पाहिजे त्याठिकाणी किफायतशीर दरात जाता यावे, हाच मुख्य उद्देश ठेवून नियोजन करण्याची गरज आहे. त्यासाठी सार्वजनिक वाहतुकीचे जाळे शहरभर पसरविले पाहिजे.

स्मार्ट सिटीच्या प्रवासात आता शहर बससेवेचा विचार होत आहे. त्यामुळे किमान पुढील काही महिन्यांत औरंगाबादेत सक्षम शहर बसचे दर्शन औरंगाबादकरांना होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

रस्त्यांवर रिक्षांचे साम्राज्य, त्यांची मनमानी थांबविण्यासाठी पाऊल उचलले पाहिजे. शहर बसला प्रतिसाद असतानाही एसटी महामंडळ नेहमीच जबाबदारी झटकत होते. त्यामुळे सर्वसामान्य प्रवाशांना गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. परंतु यापुढे शहरात प्रवाशांच्या मागणीनुसार बसेस देणे आवश्यक आहे. चिकलठाणा, मुकुंदवाडी भागातून विद्यापीठात जाणाऱ्या विद्यार्थ्यांना औरंगपुऱ्यापर्यंत बसने आणि त्यानंतर तेथून विद्यापीठाचा प्रवास रिक्षाने करावा लागतो. अशीच स्थिती इतर भागांची आहे. ती अवस्था दूर व्हावी, अशी सर्वसामान्य प्रवाशांची अपेक्षा आहे. चिकलठाणा ते वाळूज मार्गावर किमान दर २० मिनिटाला शहर बस उपलब्ध झाली पाहिजे. शिवाजीनगर, शहानूरमियाँ दर्गा चौक, सिल्लेखाना चौक, समर्थनगर, सातारा, देवळाईसह शहरातील विविध भागांत ठराविक वेळेत शहर बसची सुविधा मिळाली पाहिजे.

अत्यावश्यक मार्गांवर सेवा

सध्या चालक-वाहकांची कमतरता आहे. त्यामुळे आजघडीला अत्यावश्यक मार्गांवर शहर बस चालविण्यात येत आहे. विद्यार्थ्यांची गैरसोय होणार नाही, यासाठी पुरेपूर काळजी घेतली जात आहे.

-संदीप रायलवार, विभागीय वाहतूक अधिकारी, एसटी महामंडळ

सर्वसामान्यांना सुविधा

शहरातील रस्त्यांनुसार कोणत्या भागात कोणत्या आकाराची बस अधिक चांगली राहील, याचे नियोजन केले जात आहे. शहरातील सर्वसामान्य नागरिकांना समोर ठेवून शहर बससेवा देण्यास प्राधान्य दिले जात आहे. सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेमुळे अन्य वाहनांच्या संख्येवर नियंत्रण राहील, असे नियोजन केले जात आहे.

-नवल किशोर राम, जिल्हाधिकारी

पदवीधर मतमोजणी धीम्या गतीने

विद्यापीठ अधिसभा निवडणूक : सुनील मगरे विजयी; निकालास उलटली मध्यरात्र

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ अधिसभेच्या पदवीधर गटाच्या मतमोजणी प्रक्रियेला गुरुवारी सकाळी १० वाजता सुरुवात झाली. रात्री १२ वाजेच्या सुमारास पहिला निकाल हाती आला. यामध्ये उत्कर्ष पॅनलचे उमेदवार प्रा. सुनील मगरे ७४१९ मतांनी विजयी झाले. त्यांना ९६०१ मते मिळाली.

मतमोजणी सुरु झाल्यानंतर चार जिल्ह्यांतील मतपत्रिका संवर्गनिहाय वेगळ्या करण्यासच सायंकाळचे सहा वाजले होते. यानंतर साडेसहा वाजता अनुसूचित जाती संवर्गातील पात्र-अपात्र मते मोजण्यास सुरुवात केली. एकूण सर्व जागांचे निकाल शुक्रवारी लागतील, असे निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. साधना पांडे यांनी व्यक्त केली.

...बघा काही करता येते का?

◆ मतपत्रिका संवर्गनिहाय वेगळ्या करण्याचे काम सुरु होते. तेव्हा एका मतपत्रिकेच्या एका गठ्ठ्यामध्ये मतदाराने उमेदवारांसाठी पत्र टाकल्याचे दिसून आले. या पत्रातील मजकूर मतदाराच्या शब्दांत जशाच तसा पुढीलप्रमाणे : 'आज रोजी ग्रॅज्युएट असलेला मुलगा उमेदवाराचे लग्न करताना कायमस्वरुपी नोकरी नसल्याने अडचणी येतातच.

◆ मुलगी म्हणजे जॉब सेक्युअर पाहिजे. हा मुद्दा निवडणुकीचा जरी नसला तरी जीवनाकरिता महत्त्वाचा आहे. अनेक मुला/मुलींची लग्ने न झाल्याने वय ३५/४० झाले आहे, तरी कायम व फिक्स पे का होईना, जॉब मिळाला पाहिजे. अनेक इंजिनिअर्स, डॉक्टर्स, बीए, एमए, बीएस्सी, एमएस्सी, बीकॉम, एमकॉम बेकार आहेत. जॉब सेक्युर नाहीत. ...बघा काही करता येते का!'

विद्यापीठ अधिसभेच्या पदवीधर गटातील १० जागांसाठी सोमवारी (दि.४) चार जिल्ह्यांतील ५६ केंद्रांवर मतदान झाले. या मतांची मतमोजणी गुरुवारी सकाळी दहा वाजता क्रीडा विभागाच्या सभागृहात सुरु झाली. विद्यापीठ प्रशासनाने मागील टप्प्यातील गोंधळ लक्षात घेता यावेळी तयारीनिशी मतमोजणीला सुरुवात केली. मतमोजणीसाठी तीन शिफ्टमध्ये कर्मचाऱ्यांच्या नेमणुका केल्या. १६ हजार ८८५ मतांची वर्गवारी संवर्गनिहाय करणे आणि सर्व मतपत्रिका एकत्रित करीत २५, ५० आणि १०० गठ्ठे तयार करण्यातच सायंकाळचे सहा वाजून गेले. सायंकाळी साडेसहा वाजल्यानंतर अनुसूचित जाती गटातील पात्र आणि अपात्र मतांची मोजणी सुरु केली होती. या गटाचे निकाल लागल्यानंतर अनुसूचित जमाती, ओबीसी, व्हीजेएनटी, महिला राखीव आणि सर्वांत शेवटी खुल्या प्रवर्गातील मतमोजणी होणार आहे.

एटीएममधून निघाल्या पाचशेच्या फाटक्या आणि रंग लागलेल्या नोटा

मनस्ताप : पैसे बदलून मिळाले मात्र एटीएममध्ये असे पैसे येतात कसे?

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : सातारा परिसरातील महाराष्ट्र बँकेच्या एटीएममधून ५०० रुपयांच्या फाटक्या व रंग लागलेल्या नोटा ग्राहकास मिळाल्या. याबाबत त्यांनी बँकेशी संपर्क साधला असता बँकेने एजन्सीकडे बोट दाखविले तर एजन्सीने मुख्य शाखेत जाण्याचा सल्ला दिला.

याबाबत अधिक माहिती अशी की, प्रा. राहुल पंडित यांना कामानिमित्त काही रकमेची आवश्यकता होती. यासाठी ते सातारा परिसरातील महाराष्ट्र बँकेच्या एटीएममध्ये गेले. मशीनमधून १० हजार रुपयांची रक्कम काढण्याची सर्व प्रक्रिया त्यांनी पार पाडताच त्यांना ५०० रुपयांच्या नोटा त्यामधून मिळाल्या. त्या मोजत असताना त्यांना त्यातील बहुसंख्य नोटांना काळा रंग लागलेला तर काही नोटा फाटलेल्या आढळून आल्या.

बँक व एजन्सीने केली टोलवाटोलवी

पंडित यांनी सर्व नोटा तपासून पाहताच त्यातील ४ नोटांचे कोपरे दोन्ही बाजूंनी फाटलेले दिसले. १० नोटांना काळ्या रंगाची शाई लागली होती. ३ नोटा चिटकवलेल्या होत्या तर काही नोटांवर पेनाने लिहिलेले आढळले. याबाबत त्यांनी तेथील महाराष्ट्र बँकेशी संपर्क साधला असता कॅशिअर व सहायक व्यवस्थापकाने आमचा याच्याशी संबंध नाही म्हणत हात वर केले व एटीएममध्ये पैसे भरणाऱ्या एजन्सीचा मोबाइल क्रमांक देऊन त्यांना संपर्क साधण्यास सांगितले. यानंतर पंडित यांनी एजन्सीच्या कर्मचाऱ्यांशी संपर्क केला असता त्यांनी आमचे काम केवळ पैसे भरण्याचे आहे. तुम्ही मुख्य शाखेशी संपर्क करा असे सांगितले.

बँक व्यवस्थापकाने मागितली माफी

पंडित हे मुख्य शाखेत गेले असता त्यांना एटीएम जेथे आहे त्या शाखेतच जाण्यास सांगण्यात आले. येथे पंडित यांनी मुख्य व्यवस्थापकाशी संपर्क करुन त्यांना सर्व माहिती दिली असता त्यांनी नोटा बदलून दिल्या. तसेच त्यांच्या कर्मचाऱ्यांनी दिलेल्या चुकीच्या माहितीबद्दल माफीही मागितली. नोटा बदलून मिळाल्या असल्या तरीही बँकेत भरताना अशा नोटा बाद ठरविण्यात येतात, तर एटीएममध्ये अशा नोटा कशा हा प्रश्न अनुत्तरितच राहतो.

एटीएममधून निघालेल्या फाटक्या आणि काळी शाई लागलेल्या नोटा.

याचा तपास व्हावा

मला खूप महत्त्वाचे काम असल्याने मी रक्कम काढण्यास तेथे गेलो होतो. अशा नोटा मिळाल्याने हातात पैसे असूनदेखील त्याची किंमत नसल्याने हतबल झाल्यासारखे वाटत होते. मला झालेल्या मानसिक त्रासास जबाबदार कोण ? तसेच या नोटा एटीएममध्ये कशा येतात, याचा तपास व्हावा.

- राहुल पंडित

मुख्य शाखेशी संपर्क करा

आमचे काम फक्त मशीनमध्ये नोटा लोड करण्याचे आहे. आम्हाला महाराष्ट्र बँकेच्या मुख्य शाखेतून या नोटा मिळतात व आम्ही त्या नंतर विविध एटीएममध्ये लोड करतो. मुख्य शाखेतच संपर्क करावा.

- सचिन, एजन्सी कर्मचारी

ज्येष्ठ पशुवैद्य प्रतिष्ठानतर्फे आज पुरस्कार वितरण

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : ज्येष्ठ पशुवैद्य प्रतिष्ठानच्या वतीने ८ डिसेंबर रोजी पुरस्कर वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

उस्मानपुरा येथील कलश मंगल कार्यालयात सकाळी १०.३० वाजता सोहळ्याला सुरुवात होईल. प्रतिष्ठानच्या वार्षिक बैठक होणार आहे. त्यात जीवन गौरव पुरस्कार, उत्कृष्ट पशुवैद्य पुरस्कार, उत्कृष्ट गोपालक, शेळी पालक, कुक्कुट पालक पुरस्कार देण्यात येणार आहे. तसेच शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यशप्राप्त केलेल्या पाल्यांचाही गौरव करण्यात येणार आहे.

या सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून विभागीय सहआयुक्त (पशुसंवर्धन) डॉ. सुनील राऊतमारे व वरिष्ठ पोलीस निरीक्षक डॉ. विवेक मुगळीकर (पिंपरी चिंचवड), तर अध्यक्षपदी डॉ. श्याम जावळीकर हे उपस्थित राहणार आहेत. या सोहळ्यास सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहन उपाध्यक्ष डॉ. अरविंद मुळे यांनी केले आहे.

इंग्रजी शाळांना मिळणारे १२ कोटींचे शुल्क थकले

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : 'आरटीई' कायद्यानुसार इंग्रजी शाळांना २५ टक्के जागांवर मागासवर्गीय व वंचित घटकांतील विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याची सक्ती करण्यात आली; परंतु मागील सहा वर्षांपासून या शाळांना मिळणाऱ्या शैक्षणिक शुल्क परताव्यासाठी प्राथमिक शिक्षण विभागाने कोणतीही हालचाल केलेली नाही. त्यामुळे जिल्ह्यातील १२ कोटी रुपयांचे शुल्क शासनाकडे थकले आहे.

यासंदर्भात पत्रकारांशी बोलताना महाराष्ट्र इंग्रजी शाळा संस्थाचालक संघटनेचे (मेस्टा) प्रदेश उपाध्यक्ष प्रल्हाद शिंदे यांनी सांगितले की, दरवर्षी २५ टक्के जागांवर ऑनलाइन पद्धतीने प्रवेश पक्रिया राबवली जाते. त्यानुसार इंग्रजी शाळा विद्यार्थ्यांना प्रवेशही देतात; परंतु या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काबाबत जिल्हा परिषदेचा प्राथमिक शासनाकडे कसल्याही प्रकारचा पाठपुरावा करीत नाही.

सातत्याने 'मेस्टा'च्या वतीने शिक्षणाधिकाऱ्यांना यासंबंधीचे निवेदन दिले जाते. आतापर्यंत शासनाकडे इंग्रजी शाळांना मिळणाऱ्या शुल्क परताव्याचे जवळपास १२ कोटी रुपये थकले आहेत. राज्यात एकूण ६०० कोटी रुपये शासनाकडे थकलेले आहेत.

सहा वर्षांचा शुल्क परतावा तात्काळ अदा करण्यात यावा, शाळांना वीज व मालमत्ता करात सवलत देण्यात यावी, स्कूल बसेसना रोड टॅक्सव्यतिरिक्त अन्य कर लागू करण्यात येऊ नये, इंग्रजी शाळांना फी रेग्युलेशन कायदा लागू करण्यात यावा, इंग्रजी शाळांमधील विद्यार्थ्यांनाही पोषण आहार सुरु करण्यात यावा, इंग्रजी शाळांना स्थलांतराची परवानगी देण्यात यावी, या इतर मागण्यांसाठी १५ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजेच्या सुमारास नागपूर येथील हिवाळी अधिवेशनावर 'मेस्ट'च्या वतीने मोर्चा नेला जाणार आहे. यावेळी प्रवीण आव्हाळे, संतोष सोनवणे, शेख झिया, सचिन पवार, विजय वाडकर आदी उपस्थित होते.

दोनदिवसीय परिषद उद्यापासून

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : स्थानिक कुराण हाऊसतर्फे ९ डिसेंबरपासून दोनदिवसीय 'तामीर-ए-मुशायरा' कॉन्फरन्स होणार आहे. मौलाना आझाद रिसर्च सेंटरमध्ये सकाळी १० वाजता परिषदेचे उद्घाटन होईल. या परिषदेस प्रख्यात विद्वान अल्लामा सय्यद अब्दुल्लाह तारिक उपस्थित राहणार आहेत. अध्यक्षस्थानी सदरुन हसन नदवी हे राहतील. यावेळी जमात-ए-इस्लामी हिंदचे शहराध्यक्ष मौलाना हाफीज इलियास खान फलाही, डॉ. लईक उर-रहेमान मार्गदर्शन करणार आहेत. कार्यक्रमाचे दुसरे सत्र ९ डिसेंबर रोजी रात्री नेहरु भवन येथे होणार आहे. तिसरे सत्र १० डिसेंबर रोजी सकाळी १० ते दुपारी १ पर्यंत तापडिया नाट्यमंदिरात होईल.

हज यात्रेच्या अर्जासाठी मुदतवाढ

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : केंद्रीय हज कमिटीने २०१८ मध्ये हज यात्रेला जाणाऱ्या भाविकांकडून अर्ज मागविण्याची प्रक्रिया १५ नोव्हेंबरपासून सुरु केली होती. या प्रक्रियेला मुदतवाढ देण्यात आली असून, आता यात्रेकरुंना २२ डिसेंबरपर्यंत अर्ज करण्याची मुभा दिली आहे.

यापूर्वी घोषित केलेल्या कार्यक्रमानुसार ७ डिसेंबरपर्यंत अर्ज करण्याची मुभा होती. औरंगाबाद जिल्ह्यातील ८०० भाविकांनीच अर्ज दाखल केले होते. मागील वर्षीप्रमाणे यंदाही भाविकांना ऑनलाइन पद्धतीनेच अर्ज भरावे लागत आहेत.

आता प्रथमच सेक्स समस्यांवर अत्याधुनिक विदेशात प्रचलित लेझर व व्हॅक्युम थेरेपी उपचार
विवाहापुर्वी व विवाहानंतर समस्यांसाठी एम.बी.बी.,एस.एम.डी. डॉक्टरांचा सल्ला
हस्तमैथुन, स्वप्नदोष, विर्यदोष, शिघ्रपतन, इंद्रीय शिथिलता, पुरुष वंधत्व
हायपोगोनॅडिझममुळे इंद्रीय समस्या, मधुमेहामुळे आलेली लैंगिक शिथीलता
ऑलीगोस्पर्मीया : शुक्रजंतुची संख्या कमी असणे. ॲझुस्पर्मीया: शुक्रजंतुची संख्या अजीबात नसणे.
आशाकिरण क्लिनीक
१९८५ पासुन शास्त्रीयोक्त मार्गदर्शन केंद्र
३८, निराला बाजार, बाटा शोरुम समोर, औरंगाबाद. वेळ - स.११ ते ३ व सायं.७ ते ९ शनिवार रविवार बंद
कृपया अनावश्यक खर्चीक व फसव्या उपचारापासुन सावध मो. 7769856821 9767132521

लोकमत WINTER DHAMAKA
वृत्तपत्र वाचकांसाठी एक अभिनव योजना
पहिले बक्षीस मोटारसायकल ३
दुसरे बक्षीस मोपेड ३
तिसरे बक्षीस सोलार वॉटर हिटर ३
चौथे बक्षीस गोवा टूर ०८
पाचवे बक्षीस इलेक्ट्रीक वॉटर गिझर १२
सहावे बक्षीस इंडक्शन कुकटॉप ४०
सातवे बक्षीस एशिअन फ्लोरा १९००
कूपन कापा, चिकटवा.. प्रवेशिका पाठवा.. व सोडतीद्वारे जिंका..
लाखो रुपयांची बक्षिसे !!
आजच लोकमत घरी सुरू करा । सहभाग विनामूल्य
योजना कालावधी : ०१ डिसेंबर २०१७ ते ११ मार्च २०१८
अधिक माहितीसाठी संपर्क : • औरंगाबाद शहर : प्रताप शिरसाठ - 7385737735 । समीर शेख - 9270452444 । मयूर नखाते - 8483953711
• सिडको-हडको: प्रशांत आरक - 9011034582 । गंगाधर पठाडे - 9923685147 • वाळूज-पंढरपूर-पडेगाव : इरफान पठाण - 9823488820
• औरंगाबाद ग्रामीण : नीलेश गिरगावकर - 9922994357, मंगेश कुमठे - 9762889760
• जालना जिल्हा : किशोर मरकड - 9850361995 • बीड जिल्हा : शेख वाजेद - 7028118313